# टॅनग्रॅम

टॅनग्रॅम हे 1000 वर्षांपूर्वीचे एक चिनी कोडे आहे.
यात एका चौरसाचे सात तुकडे केले जातात.



1. एका जाड कागदावर एक चौरस काढून त्यात 16 लहान चौरस होतील अशा रेषा मारा.



2. चित्रात दाखवल्याप्रमाणे रेषा काढा.



3. या रेषांवर कापून तुम्हाला सात तुकडे मिळतील.





हे सात तुकडे निरनिराळ्या पद्धतीने एकमेकांना जोडून तुम्हाला अनेक नमुने बनवता येतील. भूमितीतील आकार, माणसे, पक्षी, प्राणी वगैरे. प्रत्येक मांडणीमध्ये सातही तुकडे वापरले पाहिजेत एवढी एकच अट आहे. यातून हजारो चित्रे बनवता येतात.

